महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2870120/21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती/नागपूर/आस्था/ 2654 /2025-26 दिनांक - 13/08/2025

## सुधारित परिपत्रक

## "भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी लष्करातील सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2025-26"

महाराष्ट्र राज्यातील, भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना लष्करातील सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2025-26 ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने महाज्योती मार्फत देण्यात येणार आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

➢ **योजनेच्या लाभासाठी पात्रता** :

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा भटक्या जमाती - क (NT - C) प्रवर्गातील असावा/असावी.
3. विद्यार्थी नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी
4. विद्यार्थी इयत्ता 10 वी अभ्यासक्रम किमान 60 टक्के गुणासह उत्तीर्ण केलेला असावा/ असावी.
5. महाज्योतीच्या कोणत्याही योजनांचा कोणत्याही स्वरुपात लाभ घेतलेल्या विद्यार्थ्याने चालू योजनेसाठी पुन्हा अर्ज करु नये, त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
6. विद्यार्थ्याची अंतिम निवड छाननी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
7. विद्यार्थ्याचे किमान वय 17 वर्ष व कमाल वय 19 वर्ष पेक्षा जास्त असू नये.
8. **वैद्यकीय अर्हता** :-
   - **उंची** :- कमीत कमी 157 से.मी (पुरुष)
     कमीत कमी 152 से.मी (महिला)
   - **छाती** :- कमीत कमी 77 से.मी (दीर्घ श्वास घेतल्यानंतर 82 से.मी) केवळ पुरुषांकरिता
9. **प्रशिक्षणाकरिता द्यावयाचे अनिवार्य वैद्यकीय मानके** :-
   - उमेदवाराचे शरीर मजबुत आणि मानसिक आरोग्य चांगले असावे.
   - छातीचा विस्तार फुगविल्यानंतर किमान 5 से.मी. होणे गरजेचे आहे.
   - प्रत्येक कानाने सामान्य ऐकणे आणि दोन्ही डोळ्यांमध्ये चांगली दुरबीन दृष्टि असणे आवश्यक आहे. त्याला प्रत्येक डोळ्याने 6/6 अंतराचा दृष्टिकोन वाचता आला पाहिजे.
     (सैन्य भरती साठी रंग दृष्टी चाचणी CP-III असावी.)
   - नैसर्गिक निरोगी हिरड्या आणि दात पुरेशा प्रमाणात असणे आवश्यक आहे. (म्हणजे किमान 14 दंत बिंदु)
   - हाडांची विकृती, हायड्रोसेल आणि व्हॅरिकोकल किंवा मुळव्याध यांसारखे रोग नसावेत.
   - लाल आणि हिरवा रंग ओळखला पाहिजे.
     (उपरोक्त सर्व कागदपत्रांची छाननी व अनिवार्य मानकांची तपासणी करुनच प्रशिक्षणाकरिता प्रवेश दिल्या जाईल. याची उमेवारांनी नोंद घ्यावी)

➢ **लाभार्थी निवड प्रक्रिया** :

1. महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.
2. विद्यार्थ्यांची मिलिटरी भरती परीक्षा पूर्व लेखी परीक्षेच्या धर्तीवर व अभ्यासक्रमानुसार चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
3. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

➢ **प्रशिक्षणाचे स्वरूप** :

1. विद्यार्थ्यांना मिलिटरी भरती परीक्षा पूर्व लेखी व शारीरिक परीक्षांचे सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.
2. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 6 महिन्यांचा असेल.
3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपाचे देण्यात येईल.
5. विद्यावेतन - 10,000/- प्रतिमाह (किमान 75% उपस्थिती असल्यास)
6. आकस्मिक निधी - 12,000/- (एकवेळ)

➢ **आरक्षण** :

**समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :

1. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.
2. महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.

➢ **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**:

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
3. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer)
5. 10 वी ची गुणपत्रिका
6. अनाथ असल्यास दाखला

➢ **अर्ज कसा करावा**.

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **“भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी लष्करातील सैनिक भरती भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2025-26 ”** करिता अर्ज यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

➢ **अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.31/08/2025 पर्यंत राहील.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. प्रशिक्षणाकरीता निवड झालेले विद्यार्थी ज्या दिनांकास संस्थेत प्रशिक्षणाकरीता रुजु होतील त्या दिनांकापासुन त्यांना महाज्योतीच्या धोरणानुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहिल.
5. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या कडून योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
6. महाज्योतीच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतला असल्यास विद्यार्थी या प्रशिक्षणास अपात्र ठरेल.
7. नमुद निकषांची पूर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करण्याऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल.
8. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे बंधनकारक आहे.
9. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर संपर्क करावा : **संपर्क क्र** - 0712-2870120/21

   **E-mail Id** : mahajyotingp@gmail.com

स्वा

(प्रशांत वावगे)

**व्यवस्थापकीय संचालक,**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,

(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर